SMBT

LOKMAT TIMES

# Successful bone marrow transplant on 17-year-old at SMBT

**LOKMAT NEWS NETWORK**
NASHIK, AUG 1



A complex bone marrow transplant procedure, often considered very challenging in the fight against cancer, was successfully performed at the Cancer Institute of SMBT Hospital, Nashik. The surgery was carried out on a 17-year-old girl from Burhanpur, Madhya Pradesh, and has given her a new lease of life.

Dr Girish Badarkhe, a haemato oncologist at SMBT Hospital, provided details about the procedure. Dean Dr Meenal Mohgaonkar and Chief Operating Officer Sachin Borse were also present. The patient was diagnosed with Hodgkin's lymphoma, a type of blood cancer, in 2021. She sought treatment at various hospitals, but the costs were prohibitive, and other hospitals were unable to provide any assurance of recovery.

Subsequently, she began treatment under Dr Badarkhe at SMBT Hospital. Initially, chemotherapy provided some relief, but the cancer recurred four times, leaving bone marrow transplant as the only viable option. Treatment at SMBT started last month, and she is currently doing well. Her cells have regenerated, and her weight is expected to gradually increase. Dr Badarkhe mentioned that she is expected to fully recover and return to her hometown in the next six months.

Nashik First
Page No. 3 Aug 02, 2024
Powered by: erelego.com

लोकमत

# एसएमबीटीमध्ये मुलीवर 'बोन मॅरो ट्रान्सप्लांट'



■ एसएमबीटी कॅन्सर इन्स्टिट्यूट गेल्या तीन वर्षांपासून कर्करोगग्रस्त रुग्णांसाठी जीवनदायी ठरले आहे.

■ टाटा मेमोरिअल हॉस्पिटलसोबत तांत्रिक मार्गदर्शनाचा करार झालेला असून, अद्ययावत कर्करोग उपचार आणि शस्त्रक्रिया याठिकाणी होत आहेत. बोन मॅरो ट्रान्सप्लांट शस्त्रक्रिया अत्यंत आव्हानात्मक उपचार पद्धती आहे. या आजाराच्या रुग्णांवर उपचार करण्यासाठी रुग्णाला याआधी मुंबई, पुणे, बंगळुरु याठिकाणी जावे लागत होते. मात्र, एसएमबीटी कॅन्सर इन्स्टिट्यूटमध्ये गेल्या काही महिन्यांपासून बोन मॅरो ट्रान्सप्लांट उपचार पद्धती करण्यात येत आहे.

**नाशिक :** कॅन्सरवरील अत्यंत अवघड समजली जाणारी बोन मॅरो ट्रान्सप्लांट (निरोगी अस्थिमज्जांचे प्रत्यारोपण) शस्त्रक्रिया एसएमबीटी हॉस्पिटलच्या कॅन्सर इन्स्टिट्यूटमध्ये यशस्वीरीत्या करण्यात आली. मध्य प्रदेशातील बुऱ्हाणपूर येथील सतरावर्षीय मुलीवर करण्यात आलेल्या या शस्त्रक्रियेने तिला जीवदान मिळाले.

एसएमबीटी हॉस्पिटलचे रक्तविकार कर्करोगतज्ज्ञ डॉ. गिरीश बदरखे यांनी याबाबतची अधिक माहिती दिली. याप्रसंगी अधिष्ठाता डॉ. मीनल मोहगावकर, चीफ ऑपरेटिंग ऑफिसर सचिन बोरसे हेदेखील उपस्थित होते. या रुग्णाला २०२१ साली हॉजस्किन्स लिम्फोमा या रक्ताच्या कर्करोगाचे निदान झाले. उपचारासाठी ते अनेक ठिकाणी गेले. मात्र, उपचारासाठी लागणारा खर्च त्यांना परवडणारा नव्हता. शिवाय, इतर रुग्णालयांत आजार घातक आणि प्रोग्रेसिव्ह असल्याचे सांगत रुग्ण बरा होण्याची शाश्वती मिळत नव्हती. यानंतर एसएमबीटी हॉस्पिटलचे रक्तविकार कर्करोगतज्ज्ञ डॉ. बदरखे यांच्याकडे त्यांनी उपचार घेण्यास सुरुवात केली. सुरुवातीला किमोथेरपी घेऊन तिला आराम मिळाला. मात्र, चार वेळा हा कर्करोग उलटून आल्याने बोन मॅरो ट्रान्सप्लांट केल्याशिवाय पर्याय नसल्याचे डॉक्टरांनी सांगितले. गेल्या महिन्यापासून तिच्यावर एसएमबीटीत उपचार सुरू होते. (वा.प्र.)

Hello Nashik Gramin
Page No. 3 Aug 01, 2024
Powered by: erelego.com

लोकमत

# 'एसएमबीटी'मध्ये उपचार; मध्य प्रदेशातील मुलगी झाली कॅन्सरमुक्त

## कॅन्सर इन्स्टिट्यूट; निरोगी अस्थिमज्जांचे प्रत्यारोपण यशस्वी

लोकमत न्यूज नेटवर्क

**संगमनेर :** कुठल्याही प्रकारच्या कॅन्सरकडे दुर्धर आजार म्हणून पाहिले जाते. मात्र, त्यावर मात करण्यासाठी असलेल्या नव्या उपचार पद्धतीमुळे मध्य प्रदेशातील बुऱ्हाणपूर येथील १७ वर्षीय मुलगी पूर्णपणे कॅन्सरमुक्त झाली आहे. या मुलीवर नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी तालुक्यातील घोटी येथील एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये उपचार करण्यात आले. कॅन्सरवरील अत्यंत अवघड समजली जाणारी उपचार पद्धती असलेली बोन मॅरो ट्रान्सप्लांट (निरोगी अस्थिमज्जांचे प्रत्यारोपण) शस्त्रक्रिया हॉस्पिटलच्या कॅन्सर इन्स्टिट्यूटमध्ये यशस्वीरीत्या पार पडली.

मध्य प्रदेशातील १७ वर्षीय मुलगी, तिला रक्ताचा कॅन्सर झाल्याचे निदान झाले. यापूर्वी केवळ किरकोळ स्वरूपाच्या आजारांसाठी तिच्या कुटुंबीयांनी दवाखान्याची पायरी चढली होती. मात्र, मुलीला कॅन्सर झाल्याचे समजल्यानंतर कुटुंबीय हतबल झाले. उपचारांसाठी तिचे कुटुंबीय तिला जळगाव जिल्ह्यातील रुग्णालयात घेऊन आले. काही परिचितांपैकी कुणीतरी मुलीला एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये उपचारांसाठी घेऊन जा, असा सल्ला दिला. त्यानंतर तिला एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये उपचारांसाठी आणण्यात आले. एसएमबीटी हॉस्पिटलचे रक्तविकार कर्करोग तज्ज्ञ डॉ. गिरीश बदरखे यांनी सांगितले, मुलीला २०२१ साली हॉजस्किन्स लिम्फोमा या रक्ताच्या कर्करोगाचे निदान झाले. उपचारासाठी ते अनेक ठिकाणी गेले; जो खर्च सांगण्यात आला तो न परवडणारा होता.

### रक्ताच्या इतर आजारांवर उपयोगी

मुलीवर एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू होते. नियमित उपचार आणि रुग्णाने दिलेला प्रतिसादामुळे बोन मॅरो ट्रान्सप्लांट शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली. या उपचार पद्धतीचा वापर हा रक्ताचा कॅन्सर अथवा रक्ताच्या इतर आजारांवर होऊ शकतो. यामध्ये सदोष काम करणाऱ्या रोगग्रस्त अस्थिमज्जा पूर्णपणे निकामी करून त्या जागी निरोगी अस्थिमज्जांचे प्रत्यारोपण केले जाते. ही उपचार पद्धती एक महिनाभर चालते. आज ती पूर्णपणे बरी आहे, तिच्या शरीरातील पेशी वाढल्या आहेत. हळूहळू वजन वाढण्यास सुरुवात होईल. पुढील सहा महिन्यांनी ती पूर्णपणे बरी होऊन तिच्या मूळ अधिवासात दाखल होणार आहे, असेही डॉ. बदरखे यांनी सांगितले.

रक्ताचा कर्करोग प्रचंड वेदनादायी असतो. हा कर्करोग सहसा बरा होणारा नसतो, असा अनेकांचा गैरसमज आहे, त्यामुळे रुग्ण इच्छाशक्ती गमावून बसलेला असतो. मात्र, सध्याच्या अद्ययावत तंत्रज्ञान आणि वेगवेगळे संशोधन यामुळे आता हा आजार बरा होत आहे. यासाठी बोन मॅरो ट्रान्सप्लांटचा पर्याय आहे.

**- डॉ. गिरीश बदरखे,** रक्तविकार तज्ज्ञ



MTB मुंबई तरुण भारत
Main Edition | 2024-08-01 | Page- 9
epaper.mahamtb.con

# युवतीची रक्त कर्करोगावर मात

## एसएमबीटी रुग्णालयात निरोगी अस्थिमज्जांचे यशस्वी प्रत्यारोपण

**नाशिक, दि. ३१ : प्रतिनिधी**

कर्करोगावरील अत्यंत अवघड समजली जाणारी निरोगी अस्थिमज्जांचे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया नुकतीच एसएमबीटी रुग्णालयाच्या कॅन्सर इन्स्टिट्युटमध्ये यशस्वीपणे पार पडली. मध्यप्रदेशातील बुऱ्हाणपूर येथील १७ वर्षीय मुलीवर ही शस्त्रक्रिया झाली. याबाबतची माहिती एसएमबीटी रुग्णालयाचे रक्तविकार कर्करोगतज्ज्ञ डॉ. गिरीश बदरखे यांनी बुधवार, दि. ३१ जुलै रोजी पत्रकार परिषदेत दिली. याप्रसंगी अधिष्ठाता डॉ. मीनल मोहगावकर, मुख्य कार्यकारी अधिकारी सचिन बोरसे आदी उपस्थित होते.

बुऱ्हाणपूर येथील रहिवासी असलेल्या १७ वर्षीय मुलीला दुर्मीळ आणि अतिशय घातक समजला जाणारा कर्करोग निष्पन्न झाला. या आजाराचे निदान झाल्यानंतर तीन ते चार महिन्यांत रुग्ण दगावण्याची शक्यता असते. २०२१ साली तिला हॉजस्किन्स लिम्फोमा या रक्ताच्या कर्करोगाचे निदान झाले. हा आजार खूप घातक आणि वाढता असल्याचे सांगत रुग्ण बरा होण्याची शाश्वती मिळत नव्हती. यानंतर एसएमबीटी रुग्णालयाचे रक्तविकार कर्करोगतज्ज्ञ डॉ. गिरीश बदरखे यांच्याकडे त्यांनी उपचार घेण्यास सुरुवात केली. सुरुवातीला केमोथेरपी घेऊन तिला आराम मिळाला. मात्र, उपचार घेऊनही चारवेळा हा कर्करोग झाल्याने अस्थिमज्जांचे प्रत्यारोपण केल्याशिवाय पर्याय नसल्याचे डॉक्टरांनी सांगितले. गेल्या महिन्यात तिच्या या आजारावर शस्त्रक्रिया आणि उपचार करण्यात आले. आज ती पूर्णपणे बरी आहे, तिच्या शरीरातील पेशी वाढल्या आहेत. हळूहळू वजन वाढण्यास सुरुवात होईल. पुढील सहा महिन्यांनी ती पूर्णपणे बरी होऊन तिच्या मूळ अधिवासात दाखल होणार आहे. नियमित उपचार आणि रुग्णाने दिलेला प्रतिसाद यामुळे या रुग्णावर अथक मेहनत घेतल्यानंतर डॉ. बदरखे आणि त्यांच्या संपूर्ण टीमने अस्थिमज्जांचे यशस्वी प्रत्यारोपण केले.




दरम्यान, कॅन्सरवरील अत्याधुनिक उपचार करताना रक्तातील कॅन्सर बरा करणे आणि बोन मॅरो ट्रान्सप्लांट करणे ही अत्यंत आव्हानात्मक उपचारपद्धती आहे. या आजाराच्या रुग्णांवर उपचार करण्यासाठी रुग्णाला याआधी मुंबई, पुणे, बंगळुरु या ठिकाणी जावे लागत होते. मात्र, एसएमबीटी कॅन्सर इन्स्टिट्युटमध्ये गेल्या काही महिन्यांपासून तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली बोन मॅरो ट्रान्सप्लांट उपचारपद्धती यशस्वीपणे करण्यात येत आहे. एसएमबीटी कॅन्सर इन्स्टिट्युट गेल्या तीन वर्षांपासून कर्करोगग्रस्त रुग्णांसाठी जीवनदायी ठरले आहे.

### रक्त कर्करोगामुळे दरवर्षी सुमारे ५० हजार मृत्यू

■ सर्वात प्राणघातक कर्करोगांमध्ये रक्ताच्या कर्करोगाचा सहावा क्रमांक आहे. रक्ताच्या कर्करोगाचे तीन मुख्य प्रकार असून ल्युकेमिया, लिम्फोमा आणि मायेलोमा अशी त्यांचे नावे आहेत. दरवर्षी देशभरात ल्युकेमियाचे ३५ हजार नवे रुग्ण, लिम्फोमाचे ३२ हजार नवे रुग्ण, तर मायेलोमाचे सात हजार नवे रुग्ण आढळतात. यासोबतच रक्ताच्या कर्करोगामुळे दरवर्षी सुमारे ५० हजार रुग्णांचा मृत्यू होतो, असे यावेळी डॉ. गिरीश बदरखे यांनी सांगितले.

### कमीतकमी खर्चात उपचार

"कर्करोगग्रस्त रुग्णांसाठी रुग्णालयात आंतरराष्ट्रीय दर्जाची उपचार सुविधा आहे. अस्थिमज्जांचे प्रत्यारोपण या अद्ययावत उपचार पद्धतीसाठी सहा सुसज्ज बेड तयार करण्यात आले आहेत. रुग्णाची आर्थिक परिस्थिती पाहता या रुग्णावर कमीत कमी भार कसा येईल, असे प्रयत्न करण्यात आले. यासाठी रुग्णालयाच्या माध्यमातून वेगवेगळ्या सामाजिक संस्थांची मदतही घेण्यात आली.

**- डॉ. मीनल मोहगावकर,**
अधिष्ठाता, एसएमबीटी रुग्णालय

### रुग्णाच्या नवजीवनाने आनंद

"रक्ताचा कर्करोग प्रचंड वेदनादायी असतो. हा कर्करोग सहसा बरा होणारा नसतो, असा अनेकांचा समज आहे. त्यामुळे रुग्ण इच्छाशक्ती गमावून बसलेला असतो. मात्र, सध्याच्या अद्ययावत तंत्रज्ञान आणि वेगवेगळे संशोधन यामुळे आता हा आजार बरा होत आहे. यासाठी बोन मॅरो ट्रान्सप्लांटचा पर्याय आहे. या मुलीलाही खूप वेदना होत होत्या, मात्र तिने उपचारांना खूप चांगला प्रतिसाद दिला. तिचे नवे जीवन आता सुरु झाल्याने खूप आनंद होत आहे.

**- डॉ. गिरीश बदरखे,**
रक्तविकार तज्ज्ञ आणि बीएमटी तज्ज्ञ,
एसएमबीटी रुग्णालय

SMBT

दिव्य मराठी

नाशिक 01-08-2024

# एसएमबीटीत १७ वर्षीय मुलीवर 'बोनमॅरो ट्रान्सप्लांट' यशस्वी

प्रतिनिधी | घोटी

मध्य प्रदेश येथील बुऱ्हाणपूर येथील १७ वर्षीय शीतलला गंभीर असलेला कर्करोग झाला होता. या आजारावर त्यांनी अनेकांकडे उपचार केले मात्र फरक पडत नव्हता. कर्करोग अर्थात कॅन्सरवरील अत्यंत अवघड समजली जाणारी उपचारपद्धती असलेली बोनमॅरो ट्रान्सप्लांट शस्त्रक्रिया नुकतीच एसएमबीटी हॉस्पिटलच्या कॅन्सर इन्स्टिट्यूटमध्ये यशस्वी पार पडली.

बुऱ्हाणपूर येथील शीतल या मुलीवर ही शस्त्रक्रिया झाली. याबाबतची माहिती एसएमबीटी हॉस्पिटलचे रक्तविकार कर्करोगतज्ज्ञ डॉ. गिरीश बदरखे यांनी पत्रकार परिषदेत दिली. याप्रसंगी अधिष्ठाता डॉ. मीनल मोहगावकर, सचिन बोरसे उपस्थिती होती. शीतल हिला २०२१ साली हॉजस्किन्स लिम्फोमा या रक्ताच्या कर्करोगाचे निदान झाले होते.



दुर्धर आजारातून बरी झालेली शीतल हिचा सत्कार करताना एसएमबीटी टीम.

DESHDOOT Times
....watching north maharashtra
epaper.deshdoot.com
04 Aug 2024 - Page 4

# Bone marrow transplant on 17-year-old girl at SMBT



**NASHIK:** A complex bone marrow transplant procedure, often considered very challenging in the fight against cancer, it was successfully performed at the Cancer Institute of SMBT Hospital, Nashik. The surgery was carried out on a 17-year-old girl from Burhanpur, Madhya Pradesh, and has given her a new lease on life.

Dr. Girish Badarkhe, a hematologist at SMBT Hospital, provided details about the procedure. Dean Dr. Meenal Mohogaonkar and Chief Operating Officer Sachin Borse were also present. The patient was diagnosed with Hodgkin's lymphoma, a type of blood cancer, in 2021. She sought treatment at various hospitals, but the costs were prohibitive, and other hospitals were unable to provide any assurance of recovery.

Subsequently, she began treatment under Dr. Badarkhe at SMBT Hospital. Initially, chemotherapy provided some relief, but the cancer recurred four times, leaving bone marrow transplant as the only viable option. Treatment at SMBT started last month, and she is currently doing well. Her cells have regenerated, and her weight is expected to gradually increase. Dr. Badarkhe mentioned that she is expected to fully recover and return to her hometown in the next six months.

SMBT

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# ‘एसएमबीटी’त युवतीवर यशस्वी ‘बोन मॅरो ट्रान्सप्लांट’

सिन्नर : पुढारी वृत्तसेवा

कर्करोगावरील अत्यंत अवघड समजली जाणारी उपचारपद्धती असलेली ‘बोन मॅरो ट्रान्सप्लांट’ अर्थातच निरोगी अस्थिमज्जांचे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया नुकतीच एसएमबीटी हॉस्पिटलच्या कॅन्सर इन्स्टिट्यूटमध्ये बुऱ्हाणपूर (मध्य प्रदेश) येथील शीतल (नाव बदललेले) या सतरावर्षीय युवतीवर यशस्वीरीत्या झाली. हॉस्पिटलचे रक्तविकार कर्करोग तज्ज्ञ डॉ. गिरीश बदरखे यांनी पत्रकार परिषदेत याबाबत माहिती दिली. यावेळी अधिष्ठाता डॉ. मीनल मोहगावकर, चीफ ऑपरेटिंग ऑफिसर सचिन बोरसे उपस्थित होते.




शीतल हिने २०२१ मध्ये हॉजस्किन्स लिम्फोमा या रक्ताच्या कर्करोगाचे एसएमबीटी हॉस्पिटल येथे डॉ. बदरखे यांच्याकडे उपचार घेण्यास सुरुवात केली. या दरम्यान, ‘बोन मॅरो ट्रान्स्प्लांट’ केल्याशिवाय पर्याय नसल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

नियमित उपचार आणि रुग्णाने दिलेला प्रतिसाद यामुळे डॉ. बदरखे आणि त्यांच्या संपूर्ण टीमने ‘बोन मॅरो ट्रान्स्प्लांट’ यशस्वी केला. या उपचारपद्धतीचा वापर हा रक्ताचा कर्करोग अथवा रक्ताच्या इतर आजारांवर होऊ शकतो. रक्ताच्या कर्करोगामुळे दर वर्षी सुमारे ५० हजार रुग्णांचा मृत्यू होतो, असे डॉ. बदरखे यांनी सांगितले. तथापि, एसएमबीटी कॅन्सर इन्स्टिट्यूट गेल्या तीन वर्षांपासून कर्करोगग्रस्त रुग्णांसाठी जीवनदायी ठरले आहे.

> “ आधीच आम्ही आजाराला घाबरलेलो होतो. पण, एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये डॉ. बदरखे यांनी बरे करण्याचा विश्वास दिला. एसएमबीटी हॉस्पिटलच्या संपूर्ण टीमचे मी खूप आभार मानते. हॉस्पिटलमधील सुविधा खूप चांगल्या आहेत. आम्हाला न परवडणाऱ्या उपचारांचा लाभ एसएमबीटी हॉस्पिटलमुळे मिळाला आहे.
>
> \- रुग्ण युवती

Ahmednagar Edition Edition
Aug 02, 2024 Page No. 05
Powered by: erelego.com

स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

‘एसएमबीटी’त युवतीवर यशस्वी ‘बोन मॅरो ट्रान्सप्लांट’

सिन्नर : पुढारी वृत्तसेवा

कर्करोगावरील अत्यंत अवघड समजली जाणारी उपचारपद्धती असलेली ‘बोन मॅरो ट्रान्स्प्लांट’ अर्थातच निरोगी अस्थिमज्जांचे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया नुकतीच एसएमबीटी हॉस्पिटलच्या कॅन्सर इन्स्टिट्यूटमध्ये बुऱ्हाणपूर (मध्य प्रदेश) येथील शीतल (नाव बदललेले) या सतरावर्षीय युवतीवर यशस्वीरीत्या झाली. हॉस्पिटलचे रक्तविकार कर्करोग तज्ज्ञ डॉ. गिरीश बदरखे यांनी पत्रकार परिषदेत याबाबत माहिती दिली. यावेळी अधिष्ठाता डॉ. मीनल मोहगावकर, चीफ ऑपरेटिंग ऑफिसर सचिन बोरसे उपस्थित होते.



शीतल हिने २०२१ मध्ये हॉजस्किन्स लिम्फोमा या रक्ताच्या कर्करोगाचे एसएमबीटी हॉस्पिटल येथे डॉ. बदरखे यांच्याकडे उपचार घेण्यास सुरुवात केली. या दरम्यान, ‘बोन मॅरो ट्रान्स्प्लांट’ केल्याशिवाय पर्याय नसल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

नियमित उपचार आणि रुग्णाने दिलेला प्रतिसाद यामुळे डॉ. बदरखे आणि त्यांच्या संपूर्ण टीमने ‘बोन मॅरो ट्रान्स्प्लांट’ यशस्वी केला. या उपचारपद्धतीचा वापर हा रक्ताचा कर्करोग अथवा रक्ताच्या इतर आजारांवर होऊ शकतो. रक्ताच्या कर्करोगामुळे दरवर्षी सुमारे ५० हजार रुग्णांचा मृत्यू होतो, असे डॉ. बदरखे यांनी सांगितले. तथापि, एसएमबीटी कॅन्सर इन्स्टिट्यूट गेल्या तीन वर्षांपासून कर्करोगग्रस्त रुग्णांसाठी जीवनदायी ठरले आहे.



आधीच आम्ही आजाराला घाबरलेलो होतो. पण, एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये आल्यानंतर डॉ. बदरखे यांनी बरे करण्याचा विश्वास दिला. एसएमबीटी हॉस्पिटलच्या संपूर्ण टीमचे मी खूप आभार मानते. हॉस्पिटलमधील सुविधा खूप चांगल्या आहेत. आम्हाला न परवडणाऱ्या उपचारांचा लाभ एसएमबीटी हॉस्पिटलमुळे मिळाला आहे.

\- रुग्ण युवती

Nashik Edition
Aug 1, 2024 Page No. 05
Powered by: erelego.com

SMBT

# सतरावर्षीय मुलीवर बोन मॅरो शस्त्रक्रिया

## एसएमबीटी हॉस्पिटलमधील डॉक्टरांच्या प्रयत्नांना यश

**लोकनामा प्रतिनिधी**

**नाशिक** : मध्य प्रदेशमधील बुरहाणपूर येथील १७ वर्षीय कर्करोगग्रस्त शीतलवर (नाव बदलले आहे) एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये बोन मॅरो ट्रान्सप्लांटची यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली. त्यामुळे तिला नवीन जीवनदान मिळाले. रक्तविकार कर्करोगतज्ज्ञ डॉ. गिरीश बदरखे यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. याप्रसंगी अधिष्ठाता डॉ. मीनल मोहगावकर, चीफ ऑपरेटिंग ऑफिसर सचिन बोरसे उपस्थित होते.

अधिक माहिती अशी की, शीतल हिला २०२१ साली हॉजस्किन्स लिम्फोमा या रक्ताच्या कर्करोगाचे निदान झाले. हा आजार खूप घातक आणि प्रोग्रेसिव्ह असल्याचे सांगत रुग्ण बरा होण्याची शाश्वती मिळत नव्हती. यानंतर एसएमबीटी हॉस्पिटलचे रक्तविकार कर्करोगतज्ज्ञ डॉ. बदरखे यांच्याकडे त्यांनी उपचार घेण्यास सुरुवात केली. सुरुवातीला किमोथेरपी घेऊन तिला आराम मिळाला. मात्र, चार वेळा हा कर्करोग उलटून आल्याने बोन मॅरो ट्रान्सप्लांट शस्त्रक्रिया केल्याशिवाय पर्याय नसल्याचे डॉक्टरांनी सांगितले. यानंतर



गेल्या महिन्यापासून तिच्यावर एसएमबीटीत उपचार सुरू होते. आज ती पूर्णपणे बरी आहे, तिच्या शरीरातील पेशी वाढल्या आहेत. हळूहळू वजन वाढण्यास सुरवात होईल.

पुढील सहा महिन्यांत ती पूर्णपणे बरी होऊन तिच्या मूळ अधिवासात दाखल होणार आहे. नियमित उपचार आणि रुग्णाने दिलेला प्रतिसाद यांमुळे या रुग्णावर अथक मेहनत घेतल्यानंतर डॉ. बदरखे आणि त्यांच्या संपूर्ण टीमने बोन मॅरो ट्रान्सप्लांट शस्त्रक्रिया यशस्वी केली. या उपचारपद्धतीचा वापर हा रक्ताचा कर्करोग अथवा रक्ताच्या इतर आजारांवर होऊ शकतो. यामध्ये सदोष काम करणाऱ्या रोगग्रस्त अस्थिमज्जा पूर्णपणे निकामी करून त्याजागी निरोगी अस्थिमज्जांचे प्रत्यारोपण केले जाते.

> कर्करोगग्रस्त रुग्णांसाठी हॉस्पिटलमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाची उपचार सुविधा साकारण्यात आली आहे. बोन मॅरो ट्रान्सप्लांट या अद्ययावत उपचार पद्धतीसाठी सहा सुसज्ज बेड तयार करण्यात आले आहेत. रुग्णाची आर्थिक परिस्थिती पाहता या रुग्णावर कमीत कमी भार कसा येईल, असे प्रयत्न करण्यात आले.
>
> -**डॉ. मीनल मोहगावकर,** अधिष्ठाता, एसएमबीटी

> रक्ताच्या कर्करोगामुळे रुग्ण इच्छाशक्ती गमावून बसलेला असतो. अद्ययावत तंत्रज्ञान आणि वेगवेगळे संशोधन यांमुळे आता हा आजार बरा होत आहे. यासाठी बोन मॅरो ट्रान्सप्लांटचा पर्याय आहे. या मुलीलाही खूप वेदना होत होत्या. तिला बरे करण्यात एसएमबीटीच्या टीमला यश आले आहे.
>
> - **डॉ. गिरीश बदरखे,** रक्तविकारतज्ज्ञ आणि बीएमटीतज्ज्ञ

SMBT

# एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये यशस्वी 'बोन मॅरो ट्रान्सप्लांट'

## बुऱ्हाणपूरच्या युवतीस मिळाले जीवदान

**सकाळ वृत्तसेवा**

नाशिक, ता. ३१ : कॅन्सरवरील अत्यंत अवघड समजली जाणारी उपचारपद्धती असलेली बोन मॅरो ट्रान्सप्लांट (निरोगी अस्थिमज्जांचे प्रत्यारोपण) शस्त्रक्रिया नुकतीच एसएमबीटी हॉस्पिटलच्या कॅन्सर इन्स्टिट्यूटमध्ये यशस्वी झाली. बुऱ्हाणपूर येथील शीतल (वय १७, नाव बदललेले आहे) या मुलीवर ही शस्त्रक्रिया झाली.

याबाबतची माहिती हॉस्पिटलचे रक्तविकार कर्करोगतज्ज्ञ डॉ. गिरीश बदरखे यांनी पत्रकार परिषदेत दिली. अधिष्ठाता डॉ. मीनल मोहगावकर, चीफ ऑपरेटिंग ऑफिसर सचिन बोरसे उपस्थित होते. शीतलला २०२१ मध्ये 'हॉजस्किन्स लिम्फोमा' या रक्ताच्या कर्करोगाचे निदान झाले. एसएमबीटी हॉस्पिटलचे रक्तविकार कर्करोगतज्ज्ञ डॉ. बदरखे यांच्याकडे उपचारास सुरवात केली.

सुरवातीला किमोथेरपीने आराम मिळाला. मात्र, चारवेळा कर्करोग उलटून आल्याने 'बोन मॅरो ट्रान्सप्लांट'शिवाय पर्याय नव्हता. गेल्या महिन्यापासून तिच्यावर 'एसएमबीटी'त उपचार सुरू होते. आज ती पूर्णपणे बरी झाली आहे. तिच्या शरीरातील पेशी वाढल्या आहेत. हळूहळू वजन वाढण्यास सुरवात होईल. पुढील सहा महिन्यांनी ती पूर्णपणे बरी होऊन तिच्या मूळ अधिवासात दाखल होणार आहे.

नियमित उपचार आणि रुग्णाने दिलेला प्रतिसाद यामुळे अथक मेहनतीनंतर डॉ. बदरखे आणि त्यांच्या संपूर्ण टीमने 'बोन मॅरो ट्रान्सप्लांट' शस्त्रक्रिया यशस्वी केला.



नाशिक : एसएमबीटी हॉस्पिटलच्या कॅन्सर इन्स्टिट्यूटमध्ये बोन मॅरो ट्रान्सप्लांट शस्त्रक्रियेनंतर रुग्णाचे स्वागत करताना अधिष्ठाता डॉ. मीनल मोहगावकर, चीफ ऑपरेटिंग ऑफिसर सचिन बोरसे, डॉ. गिरीश बदरखे आदी.

" आर्थिक परिस्थितीमुळे कोणताही रुग्ण रुग्णालयातून परत जाऊ नये, या उद्देशाने एसएमबीटी हॉस्पिटलची वाटचाल सुरू आहे. कर्करोगग्रस्त रुग्णांसाठी हॉस्पिटलमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाची उपचार सुविधा साकारली आहे. 'बोन मॅरो ट्रान्सप्लांट' या अद्ययावत उपचार पद्धतीसाठी सहा सुसज्ज बेड आहेत. रुग्णाची आर्थिक परिस्थिती पाहता या रुग्णावर कमीत कमी भार कसा येईल, असे प्रयत्न केले. यासाठी हॉस्पिटलच्या माध्यमातून वेगवेगळ्या सामाजिक संस्थांची मदतही घेतली.

**- डॉ. मीनल मोहगावकर,** अधिष्ठाता, एसएमबीटी हॉस्पिटल

" पुतणीला कर्करोग असल्याने खूप टेन्शन आले होते. स्थानिक डॉक्टरांच्या मदतीने एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये आलो. डॉ. बदरखे यांच्याकडे उपचार सुरू झाले. डॉक्टरांनी आमची संपूर्ण टीम तिला बरे करण्यासाठी कसोशीने प्रयत्न करेल, असा विश्वास दिला होता. आज ती बरी झाली. हॉस्पिटलमधील सुविधा खूप चांगल्या असून, न परवडणाऱ्या उपचाराचा लाभ पुतणीला मिळाला.

**- रुग्णाचे काका**

एसएमबीटी कॅन्सर इन्स्टिट्यूट तीन वर्षांपासून कर्करोगग्रस्त रुग्णांसाठी जीवनदायी ठरले आहे. टाटा मेमोरियल हॉस्पिटलसोबत तांत्रिक मार्गदर्शनाचा करार झाला असून, अद्ययावत कर्करोग उपचार आणि शस्त्रक्रिया याठिकाणी होत आहेत.

**SMBT**

नवी आशा नवी दिशा

# सार्वमत

epaper.deshdoot.com
01 Aug 2024 - Page 02

## 'एसएमबीटी'तील अस्थिमज्ञा प्रत्यारोपणाने तरुणीला नवजीवन

### शस्त्रक्रियेअंती कॅन्सरवर मात : शरीरात निरोगी पेशी वधारल्या



**मनस्वी आनंद**

▸ रक्ताचा कर्करोग प्रचंड वेदनादायी असतो. हा कर्करोग सहसा बरा होणारा नसतो असा अनेकांचा समज आहे, त्यामुळे रुग्ण इच्छाशक्ती गमावून बसलेला असतो. या मुलीलाही खूप वेदना होत्या, मात्र तिने उपचारांना चांगला प्रतिसाद दिला व आज रुग्णाला बरे करण्यात एसएमबीटीच्या टीमला यश आले आहे. तिचे नवे जीवन आता सुरु झाल्याने खूप आनंद होत आहे.

–डॉ. गिरीश बदरखे

संगमनेर (प्रतिनिधी)– कॅन्सरवरील अत्यंत अवघड समजली जाणारी उपचारपद्धती असलेली बोन मॅरो ट्रान्सप्लांट (निरोगी अस्थिमज्जांचे प्रत्यारोपण) शस्त्रक्रिया नुकतीच एसएमबीटी हॉस्पिटलच्या कॅन्सर इन्स्टीट्यूटमध्ये पार पडली. या यशस्वी शस्त्रक्रियेमुळे बुऱ्हाणपूर येथील एका १७ वर्षीय तरूणीला नवजीवन मिळाले आहे.

याबाबत एसएमबीटी हॉस्पिटलचे रक्तविकार कर्करोग तज्ञ डॉ. गिरीश बदरखे यांनी नाशिक येथे अधिक माहिती दिली. अधिष्ठाता डॉ.मीनल मोहगावकर, चीफ ऑपरेटिंग ऑफिसर सचिन बोरसे यावेळी उपस्थित होते. शितल (नाव बदललेले) हिला २०२१ साली हॉजस्किन्स लिम्फोमा या रक्ताच्या कर्करोगाचे निदान झाले. उपचारासाठी ते अनेक ठिकाणी गेले; सर्वत्र उपचारासाठी जो खर्च सांगण्यात आला तो न परवडणारा होता. शिवाय, हा आजार खूप घातक आणि प्रोग्रेसिव्ह असल्याचे सांगत रुग्ण बरा होण्याची शाश्वती मिळत नव्हती. यानंतर एसएमबीटी हॉस्पिटलचे रक्तविकार कर्करोगतज्ञ डॉ.बदरखे यांच्याकडे त्यांनी उपचार घेण्यास सुरुवात केली. सुरुवातीला किमोथेरपी घेऊन तिला आराम मिळाला मात्र, चार वेळा हा कर्करोग उलटून आल्याने बोन मॅरो ट्रान्सप्लांट केल्याशिवाय पर्याय नसल्याचे डॉक्टरांनी सांगितले. यानंतर गेल्या महिन्यापासून तिच्यावर एसएमबीटीत उपचार सुरु होते. आता ती पूर्णपणे बरी आहे, तिच्या शरीरातील पेशी वाढल्या आहेत. हळूहळू वजन वाढण्यास सूरूवात होईल. पुढील सहा महिन्यांनी ती पूर्णपणे बरी होऊन तिच्या मूळ अधिवासात दाखल होणार आहे. नियमित उपचार आणि रुग्णाने दिलेला प्रतिसाद यामुळे या रुग्णावर अथक मेहनत घेतल्यानंतर डॉ.बदरखे आणि त्यांच्या संपूर्ण टीमने बोन मॅरो ट्रान्सप्लांट यशस्वी केला. या उपचारपद्धतीचा वापर हा रक्ताचा कर्करोग अथवा रक्ताच्या इतर आजारांवर होऊ शकतो. यामध्ये सदोष काम करणाऱ्या रोगग्रस्त अस्थिमज्जा पूर्णपणे निकामी करून त्याजागी निरोगी अस्थिमज्जांचे प्रत्यारोपण केले जाते. ही उपचारपद्धती एक महिनाभर चालते अशी माहिती डॉ.बदरखे यांनी दिली. दरम्यान, एसएमबीटी कॅन्सर इन्स्टीट्यूट गेल्या तीन वर्षांपासून कर्करोगग्रस्त रुग्णांसाठी जीवनदायी ठरले आहे.

---

# पुण्य नगरी

## 'एसएमबीटी'मध्ये 'बोन मॅरो ट्रान्सप्लांट' यशस्वी!

### १७ वर्षीय कॅन्सरग्रस्त मुलीवर अवघड शस्त्रक्रिया

नाशिक : कर्करोग अर्थात कॅन्सरवरील अत्यंत अवघड समजली जाणारी उपचारपद्धती असलेली बोन मॅरो ट्रान्सप्लांट (निरोगी अस्थिमज्जांचे प्रत्यारोपण) शस्त्रक्रिया नुकतीच एसएमबीटी हॉस्पिटलच्या कॅन्सर इन्स्टिट्यूटमध्ये यशस्वीरीत्या पार पडली. बऱ्हाणपूर येथील १७ वर्षीय मुलीवर ही शस्त्रक्रिया झाली.

एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत या हॉस्पिटलचे रक्तविकार कर्करोग तज्ज्ञ डॉ. गिरीश बदरखे यांनी यासंदर्भात माहिती दिली. याप्रसंगी अधिष्ठाता डॉ. मीनल मोहगावकर, चिफ ऑपरेटिंग ऑफिसर सचिन बोरसे उपस्थित होते. मध्य प्रदेशमधील बऱ्हाणपूर येथील १७ वर्षीय शीतलला (नाव बदलले आहे) दुर्मीळ; पण अतिशय घातक समजला जाणारा कर्करोग निष्पन्न झाला. २०२१ साली तिला 'हॉजस्किन्स लिम्फोमा' या रक्ताच्या कर्करोगाचे निदान झाले. उपचारासाठी तिचे कुटुंबीय अनेक ठिकाणी गेले; मात्र, त्यांना



**कर्करोगासाठी अत्याधुनिक उपचार केंद्र**

एसएमबीटी कॅन्सर इन्सिट्यूटमध्ये टाटा स्मारक केंद्राच्या तांत्रिक मार्गदर्शनासह कॅन्सर रुग्णांवर उपचार केले जातात. कर्करोगावरील भारतीय संशोधन असलेली कार–टी सेल थेरपी देखील याठिकाणी होत असून, इम्युनोअक्टसोबत एसएमबीटीचा करार झालेला आहे. कर्करोग शस्त्रक्रिया, तोंडाची शस्त्रक्रिया, स्तनांच्या कर्करोगाची शस्त्रक्रिया, मेंदूच्या गाठींची शस्त्रक्रिया, तसेच मेडिकल ऑन्कोलॉजी किमोथेरपी, इम्युनोथेरपी, हार्मोनल थेरपी करण्यात येते. या अतिशय अवघड असलेल्या उपचार सुविधा याठिकाणी उपलब्ध आहेत.

सांगण्यात आलेला खर्च न परवडणारा होता. शिवाय, हा आजार अतिशय घातक आणि प्रोग्रेसिव्ह असल्याचे सांगत, रुग्ण बरा होण्याची शाश्वतीही मिळत नव्हती.

एसएमबीटी हॉस्पिटलचे डॉ. बदरखे यांच्याकडे शीतलने उपचार घेण्यास सुरुवात केली. सुरुवातीला किमोथेरपी घेऊन तिला आराम मिळाला मात्र, चार वेळा हा कर्करोग उलटून आल्याने बोन मॅरो ट्रान्सप्लांट केल्याशिवाय पर्याय नसल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

त्यानंतर गेल्या महिन्यापासून तिच्यावर 'एसएमबीटी'त उपचार सुरू होते. आज ती पूर्णपणे बरी आहे, तिच्या शरीरातील पेशी वाढल्या आहेत. हळूहळू वजन वाढण्यास सुरुवात होईल. पुढील सहा महिन्यांनी ती पूर्णपणे बरी होऊन तिच्या मूळ अधिवासात दाखल होणार आहे. नियमित उपचार आणि रुग्णाने दिलेला प्रतिसादामुळे शस्त्रक्रिया यशस्वी झाली आहे.

या उपचारपद्धतीचा वापर हा रक्ताचा कर्करोग अथवा रक्ताच्या इतर आजारांवर होऊ शकतो. यामध्ये सदोष काम करणाऱ्या रोगग्रस्त अस्थिमज्जा पूर्णपणे निकामी करून त्याजागी निरोगी अस्थिमज्जांचे प्रत्यारोपण केले जाते. ही उपचारपद्धती एक महिनाभर चालते, अशी माहिती डॉ. बदरखे यांनी दिली.

**कमीत कमी खर्चात उपचार**

आर्थिक परिस्थितीमुळे कोणताही रुग्ण रुग्णालयातून परत जाऊ नये या उद्देशाने 'एसएमबीटी' हॉस्पिटलची वाटचाल सुरू आहे. कर्करोगग्रस्त रुग्णांसाठी हॉस्पिटलमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाची उपचार सुविधा साकारण्यात आली आहे. बोन मॅरो ट्रान्सप्लांट या अद्ययावत उपचार पद्धतीसाठी सहा सुसज्ज बेड्स तयार करण्यात आले आहेत.

– डॉ. मीनल मोहगावकर,
अधिष्ठाता, एसएमबीटी हॉस्पिटल

Nashik Edition Edition
Aug 01, 2024 Page No. 04
Powered by: erelego.com

आपल्या बातम्या, आतल्या बातम्या...
आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# `एसएमबीटी`त मुलीवर यशस्वी 'बोन मॅरो ट्रान्सप्लांट'

नाशिक । मध्य प्रदेशातील एका सुशिक्षित पण बेताची परिस्थिती असलेल्या कुटुंबातील १७ वर्षीय मुलीवर यशस्वी बोन मॅरो ट्रान्स्पांट (बीएमटी) शस्त्रक्रिया करत एमएमबीटी हॉस्पिटलने तिला जीवदान दिले.

कॅन्सरवरील अत्यंत अवघड समजली जाणारी उपचारपद्धती अर्थात बोन मॅरो ट्रान्सप्लांट (निरोगी अस्थिमज्जांचे प्रत्यारोपण) शस्त्रक्रिया नुकतीच एसएमबीटी हॉस्पिटलच्या कॅन्सर इन्स्टिट्यूटमध्ये यशस्वी झाली. मध्यप्रदेशमधील बुऱ्हाणपूर येथील १७ वर्षीय शितलला (नाव बदललेले) या हॉस्पिटलने जीवदान दिले. एसएमबीटीचे रक्तविकार कर्करोग तज्ञ डॉ. गिरीश बदरखे यांनी पत्रकार परिषदेत याबाबत माहिती दिली. याप्रसंगी अधिष्ठाता डॉ मीनल मोहगावकर, चीफ ऑपरेटिंग ऑफिसर सचिन बोरसे उपस्थित होते.

शीतलला कुटुंबाने मुलीला चांगले शिकवून मोठे बनवायचा दृढनिश्चय केलेला असतानाच अचानक तिला दुर्मिळ व घातक समजला जाणारा कर्करोग निष्पन्न झाला. ३-४ महिन्यात अशा आजाराचे रुग्ण दगावण्याची शक्यता असते, असे डॉक्टरांचे म्हणणे ऐकून तिच्या कुटुंबातील सर्वांना धक्का बसला. शितलला २०२१ साली हॉजस्किन्स लिम्फोमा या रक्ताच्या कर्करोगाचे निदान झाले. उपचारासाठी ते अनेक ठिकाणी गेले; सर्वत्र उपचारासाठी जो खर्च सांगण्यात आला तो न परवडणारा होता. शिवाय, रुग्ण बरा होण्याची शाश्वती मिळत नव्हती. यानंतर एसएमबीटीचे रक्तविकार कर्करोगतज्ञ डॉ. बदरखे यांच्याकडे त्यांनी उपचार घेण्यास सुरुवात केली. सुरुवातीला किमोथेरपी घेऊन तिला आराम मिळाला मात्र, चार वेळा हा कर्करोग उलटून आल्याने बोनमॅरो ट्रान्सप्लांटशिवाय पर्याय नसल्याचे डॉक्टरांनी सांगितले यानंतर गेल्या महिन्यापासून तिच्यावर एसएमबीटीत उपचार सुरू होते. आज ती पूर्णपणे बरी असून, तिच्या पेशी वाढल्या आहेत.




रक्ताचा कर्करोग प्रचंड वेदनादायी असतो. हा कर्करोग सहसा बरा होणारा नसतो असा अनेकांचा समज आहे. त्यामुळे रुग्ण इच्छाशक्ती गमावून बसलेला असतो. मात्र, अद्ययावत तंत्रज्ञान व वेगवेगळे संशोधन यामुळे आता हा आजार बरा होतो. यासाठी बोन मॅरो ट्रान्सप्लांटचा पर्याय आहे. या मुलीलाही खूप वेदना होत होत्या. तिने उपचारांना चांगला प्रतिसाद दिला. त्यामुळे रुग्णाला बरे करण्यात एसएमबीटीच्या टीमला यश आले आहे. **– डॉ. गिरीश बदरखे,**
रक्तविकार व बीएमटी तज्ञ, एसएमबीटी

## कमी खर्चात उपचार

आर्थिक परिस्थितीमुळे कोणताही रुग्ण रुग्णालयातून परत जाऊ नये या उद्देशाने एसएमबीटी हॉस्पिटलची वाटचाल सुरू आहे. बोनमॅरो ट्रान्सप्लांट उपचार पद्धतीसाठी सहा सुसज्ज बेड्स तयार करण्यात आले आहेत. रुग्णाची आर्थिक परिस्थिती पाहता या रुग्णावर कमीत कमी भार कसा येईल, यासाठी प्रयत्न करण्यात आले. त्यासाठी हॉस्पिटलच्या माध्यमातून वेगवेगळ्या सामाजिक संस्थांची मदतदेखील घेण्यात आली. **– डॉ. मीनल मोहगावकर,**
अधिष्ठाता, एसएमबीटी हॉस्पिटल

Nashik Edition Edition
Aug 02, 2024 Page No. 6
Powered by: erelego.com

# एसएमबीटीमध्ये १७ वर्षीय मुलीवर यशस्वी 'बोन मॅरो ट्रान्सप्लांट'

नाशिक : प्रतिनिधी

**कुटुंबातील बहुतांश सदस्यांनी कधीही दवाखान्याची पायरीदेखील चढलेली नसेल. कुटुंब सुशिक्षित पण परिस्थिती बेताचीच. मुलीच्या जन्माचा आनंदोत्सव साजरा केला गेला; चांगले शिक्षण देऊन खूप मोठे बनवायचे असा दृढ निश्चय झालेला असतानाच अचानक तिला दुर्मिळ पण अतिशय घातक समजला जाणारा कर्करोग निष्पन्न झाला.**

हा आजार खूप भयंकर आहे, जास्तीत जास्त ३-४ महिन्यांत अशा आजाराचे रुग्ण दगावण्याची शक्यता असते असे डॉक्टरांचे म्हणणे ऐकून घरातील सर्वच अक्षरशः सुन्न झाले. ही कथा आहे, मध्यप्रदेशमधील बुऱ्हाणपूर येथील १७ वर्षीय शीतलची (नाव बदललेले). जिचा मागील काही वर्षांचा प्रवास, तिला झालेला त्रास आणि या आजारावर तिने मिळवलेले यश हे सर्वांसाठीच प्रेरणादायी ठरणार आहे.

कर्करोग अर्थात कॅन्सरवरील अत्यंत अवघड समजली जाणारी उपचारपद्धती असलेली बोन मॅरो ट्रान्सप्लांट (निरोगी अस्थिमज्जांचे प्रत्यारोपण) शस्त्रक्रिया नुकतीच एसएमबीटी हॉस्पिटलच्या कॅन्सर इन्स्टीट्युटमध्ये यशस्वी पार पडली. याबाबतची माहिती एसएमबीटी हॉस्पिटलचे रक्तविकार कर्करोग तज्ज्ञ डॉ. गिरीश बदरखे यांनी पत्रकार परिषदेत दिली. याप्रसंगी अधिष्ठाता डॉ मीनल मोहगावकर, चीफ ऑपरेटिंग ऑफिसर सचिन बोरसे यांची उपस्थिती होती.

शितल (नाव बदललेले) हिला २०२१ साली हॉजस्किन्स लिम्फोमा या रक्ताच्या कर्करोगाचे निदान झाले. उपचारासाठी ते अनेक ठिकाणी गेले; सर्वत्र उपचारासाठी जो खर्च सांगण्यात आला तो न परवडणारा होता. शिवाय, हा आजार खूप घातक आणि प्रोग्रेसिव्ह असल्याचे सांगत रुग्ण बरा होण्याची शाश्वती मिळत नव्हती. यानंतर एसएमबीटी हॉस्पिटलचे रक्तविकार कर्करोगतज्ञ डॉ बदरखे यांच्याकडे त्यांनी उपचार घेण्यास सुरुवात केली.

सुरुवातीला किमोथेरपी घेऊन तिला आराम मिळाला मात्र, चार वेळा हा कर्करोग उलटून आल्याने बोन मॅरो ट्रान्सप्लांट केल्याशिवाय पर्याय नसल्याचे डॉक्टरांनी सांगितले. यानंतर गेल्या महिन्यापासून तिच्यावर एसएमबीटीत उपचार सुरु होते. आज ती पूर्णपणे बरी आहे, अशी माहिती डॉ बदरखे यांनी दिली.

टाटा मेमोरियल हॉस्पिटलसोबत तांत्रिक मार्गदर्शनाचा करार झालेला असून एसएमबीटी कॅन्सर इन्स्टीट्युटमध्ये गेल्या काही महिन्यांपासून तज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली बोन मॅरो ट्रान्सप्लांट उपचारपद्धती यशस्वीपणे करण्यात येत आहे.

रक्ताचा कर्करोग प्रचंड वेदनादायी असतो. हा कर्करोग सहसा बरा होणारा नसतो असा अनेकांचा समज आहे, त्यामुळे रुग्ण इच्छाशक्ती गमावून बसलेला असतो. मात्र, सध्याच्या अद्ययावत तंत्रज्ञान आणि वेगवेगळे संशोधन यामुळे आता हा आजार बरा होत आहे. यासाठी बोन मॅरो ट्रान्सप्लांटचा पर्याय आहे. या मुलीलाही खूप वेदना होत होत्या, मात्र तिने उपचारांना खूप चांगला प्रतिसाद दिला व आज रुग्णाला बरे करण्यात एसएमबीटीच्या टीमला यश आले आहे, असे डॉ गिरीश बदरखे म्हणाले.

माझ्या पुतणीला कॅन्सर आहे असे समजल्यावर खूप टेन्शन आले होते. यानंतर स्थानिक डॉक्टरांच्या मदतीने आम्ही एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये आलो. डॉ. गिरीश बदरखे यांच्याकडे उपचार सुरु झाले. डॉक्टरांनी आम्हाला विश्वास दिला की, आमची संपूर्ण टीम तिला बरे करण्यासाठी कसोशीने प्रयत्न करेल. आज ती बरी झाली आहे, असे रुग्णाचे काका म्हणाले.



## कमीत कमी खर्चात उपचार

आर्थिक परिस्थितीमुळे कोणताही रुग्ण रुग्णालयातून परत जाऊ नये या उद्देशाने एसएमबीटी हॉस्पिटलची वाटचाल सुरु आहे. कर्करोगग्रस्त रुग्णांसाठी हॉस्पिटलमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाची उपचार सुविधा साकारण्यात आली आहे. बोन मॅरो ट्रान्सप्लांट या अद्ययावत उपचार पद्धतीसाठी सहा सुसज्ज बेड तयार करण्यात आले आहेत. रुग्णाची आर्थिक परिस्थिती पाहता या रुग्णावर कमीत कमी भार कसा येईल असे प्रयत्न करण्यात आले.

**- डॉ. मीनल मोहगावकर, अधिष्ठाता, एसएमबीटी हॉस्पिटल**

SMBT

शिल्पकार विकासाचा...
देशदूत
नाशिक आवृत्ती
epaper.deshdoot.com
01 Aug 2024 - Page 9

# एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये यशस्वी बोन मॅरो ट्रान्सप्लांट

▸▸ नाशिक | प्रतिनिधी

बुऱ्हाणपूर येथील एका १७ वर्षीय मुलीला दुर्मिळ पण अतिशय घातक समजला जाणारा कर्करोग निष्पन्न झाला. जास्तीत जास्त ३-४ महिन्यात अशा आजाराचे रुग्ण दगावण्याची शक्यता असते. कर्करोग अर्थात कॅन्सरवरील अत्यंत अवघड समजली जाणारी उपचारपद्धती असलेली बोन मॅरो ट्रान्सप्लांट शस्त्रक्रिया नुकतीच एसएमबीटी हॉस्पिटलच्या कॅन्सर इन्स्टिट्यूटमध्ये यशस्वी पार पडली.



रक्तविकार कर्करोगतज्ज्ञ डॉ. गिरीश बदरखे यांनी पत्रकार परिषदेत याविषयी माहिती दिली. यावेळी अधिष्ठाता डॉ. मीनल मोहगावकर, चीफ ऑपरेटिंग ऑफिसर सचिन बोरसे यांची उपस्थिती होती.

संबंधित रुग्णावर गेल्या महिन्यापासून एसएमबीटीत उपचार सुरु होते. आज ती पूर्णपणे बरी आहे, तिच्या शरीरातील पेशी वाढल्या आहेत. हळूहळू वजन वाढण्यास सुरूवात होईल. पुढील सहा महिन्यांनी ती पूर्णपणे बरी होऊन तिच्या मूळ अधिवासात दाखल होणार आहे. नियमित उपचार आणि रुग्णाने दिलेला प्रतिसाद यामुळे या रुग्णावर अथक मेहनत घेतल्यानंतर डॉ बदरखे आणि त्यांच्या संपूर्ण टीमने बोन मॅरो ट्रान्सप्लांट यशस्वी केला. या उपचारपद्धतीचा वापर हा रक्ताचा कर्करोग अथवा रक्ताच्या इतर आजारांवर होऊ शकतो. यामध्ये सदोष काम करणाऱ्या रोगग्रस्त अस्थिमज्जा पूर्णपणे निकामी करून त्याजागी निरोगी अस्थिमज्जांचे प्रत्यारोपण केले जाते. ही उपचारपद्धती एक महिनाभर चालते अशी माहिती डॉ. बदरखे यांनी दिली. एसएमबीटी कॅन्सर इन्स्टिट्यूट गेल्या तीन वर्षांपासून कर्करोगग्रस्त रुग्णांसाठी जीवनदायी ठरले आहे. टाटा मेमोरियल हॉस्पिटलसोबत तांत्रिक मार्गदर्शनाचा करार झालेला असून अद्ययावत कर्करोग उपचार आणि शस्त्रक्रिया याठिकाणी होत आहेत. अत्याधुनिक उपचारपद्धतीला महत्त्व देत सुसज्ज युनिट याठिकाणी कार्यरत आहे. येथे गेल्या काही महिन्यांपासून तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली बोन मॅरो ट्रान्सप्लांट उपचारपद्धती यशस्वीपणे करण्यात येत आहे.

> आर्थिक परिस्थितीमुळे कोणताही रुग्ण रुग्णालयातून परत जाऊ नये या उद्देशाने एसएमबीटी हॉस्पिटलची वाटचाल सुरु आहे. कर्करोगग्रस्त रुग्णांसाठी हॉस्पिटलमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाची उपचार सुविधा साकारण्यात आली आहे. बोन मॅरो ट्रान्सप्लांट या अद्ययावत उपचार पद्धतीसाठी सहा सुसज्ज बेड तयार करण्यात आले आहेत.
>
> ■ डॉ. मीनल मोहगावकर

# एसएमबीटी अस्पताल में सफल अस्थि मज्जा प्रत्यारोपण

## 17 वर्षीय कैंसर पीड़ित लड़की की बेहद कठिन सर्जरी की गई

महानगर नेटवर्क

नाशिक

अस्थि मज्जा प्रत्यारोपण सर्जरी, जिसे कैंसर के लिए बहुत कठिन माना जाता था। हाल ही में एसएमबीटी अस्पताल के कैंसर संस्थान में सफलतापूर्वक सर्जरी की गई। यह सर्जरी बुरहानपुर की 17 साल की लड़की को की गई। इसकी जानकारी एसएमबीटी अस्पताल के के रक्त कैंसर विशेषज्ञ गिरीश बदरखे ने एक प्रेस कॉन्फ्रेंस में दी है। इस अवसर पर संस्थापक डॉ. मीनल मोहगावकर, सीईओ सचिन बोरसे उपस्थित थे। बुरहानपुर की रहने वाली एक 17 वर्षीय लड़की को



दुर्लभ और अत्यधिक घातक कैंसर का पता चला था। इस बीमारी का पता चलने के बाद 3 से 4 महीने के अंदर मरीज की मृत्यु होने की संभावना रहती है। 2021 में उन्हें हॉजस्किन्स लिम्फोमा, एक रक्त कैंसर का पता चला था। यह कहते हुए कि बीमारी बहुत खतरनाक और बढ़ती जा रही है, इसकी कोई गारंटी नहीं थी कि मरीज ठीक हो जायेगा। इसके बाद एसएमबीटी हॉस्पिटल के रक्त कैंसर विशेषज्ञ डॉ. बदरखे से इलाज कराना शुरू किया। शुरुआत में कीमोथेरेपी से उन्हें राहत मिली। हालांकि, इलाज के बावजूद डॉक्टर ने कहा कि कैंसर के कारण चार बार बोन मैरो ट्रांसप्लांट कराने के अलावा कोई विकल्प नहीं है। पिछले महीने इस बीमारी के लिए उनकी सर्जरी और इलाज हुआ था।

### न्यूनतम लागत पर इलाज

> “हमारे अस्पताल में कैंसर रोगियों के लिए अंतर्राष्ट्रीय मानक उपचार सुविधाएं लागू की गई हैं। अस्थि मज्जा प्रत्यारोपण की नवीनतम उपचार पद्धति के लिए छह सुसज्जित बेड तैयार किए गए हैं। मरीज की आर्थिक स्थिति को देखते हुए मरीज पर बोझ कम करने का प्रयास किया गया। इसके लिए अस्पताल के माध्यम से विभिन्न सामाजिक संगठनों की भी मदद ली गई।
>
> - डॉ. मीनल मोहगावकर, (संस्थापक, एसएमबीटी अस्पताल)